जनसंपर्क कक्ष
17 AUG 2022 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ

विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी १२५ फुटी तिरंगी ध्वजासह काढलेली फेरी हे स्वातंत्र्य दिन सोहळ्याचे मुख्य आकर्षण राहिले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठाच्या प्रांगणात ध्वजवंदन झाले. सामूहिक राष्ट्रगीत गायन केले. प्रांगणातील छत्रपती शिवराय यांच्या भव्य पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्प वाहून अभिवादन केले. कुलगुरू डॉ. शिर्के आणि मान्यवरांच्या नेतृत्वाखाली १२५ फुटी तिरंगा ध्वजासह विद्यापीठ प्रांगणात फेरी काढली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजवंदन झाले.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठाता डॉ. एस. एच. ठकार, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. डी. बी. सुतार, आजीवन अध्ययन विकास केंद्राचे संचालक डॉ. ए. एम. गुरव, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना संचालक अभय जायभाये उपस्थित होते. विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना कक्ष आणि संगीत आणि नाट्यशास्त्र अधिविभागाने नियोजन केले.

जनसंपर्क कक्ष
17 AUG 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ : १२५ फुटी तिरंगा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव, शिवाजी विद्यापीठाचा हीरकमहोत्सव या संयुक्त पार्श्वभूमीवर साजऱ्या झालेल्या स्वातंत्र्यदिनाचा उत्साह शिवाजी विद्यापीठात ओसंडून वाहिला. विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी १२५ फुटी तिरंगी ध्वजासह काढलेली फेरी हे या स्वातंत्र्यदिन सोहळ्याचे मुख्य आकर्षण राहिले. 'हर घर तिरंगा' या मोहिमेप्रमाणेच 'हर हाथ तिरंगा' घेऊन स्वातंत्र्यदिनाचा आनंद द्विगुणीत केला.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठाच्या प्रांगणात ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी सामूहिक राष्ट्रगीत गायन करण्यात आले. त्यानंतर प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. यानंतर कुलगुरू डॉ. शिर्के आणि मान्यवरांच्या नेतृत्वाखाली १२५ फुटी तिरंगा ध्वजासह विद्यापीठ प्रांगणात फेरी काढण्यात आली. यावेळी प्रत्येक उपस्थिताच्या हातामध्येही तिरंगा ध्वज होता. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. एस. एच ठकार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. डी. बी. सुतार, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. पी. टी. गायकवाड, अभय जायभाये आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी १२५ फुटी तिरंगी ध्वजासह काढलेली फेरी.**

17 AUG 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# विद्यापीठात शिव-वाणी' वाहिनीचे उद्घाटन

## अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना' ध्वनी मालिकेपासून सुरुवात : कार्यक्रमाला मान्यवरांची उपस्थिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त शिवाजी विद्यापीठात 'शिव-वाणी' या वाहिनीचे लोकार्पण करण्यात आले. सुरुवातीला 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना' या ध्वनी-मालिकेस प्रारंभ केला. स्वातंत्र्यसैनिकांच्या योगदानाला उजाळा देण्याच्या विद्यापीठाच्या या प्रयत्नाचे निश्चितपणे स्वागत होईल, असा विश्वास कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केला. शिवाजी विद्यापीठाच्या जनसंपर्क कक्षाच्या 'शिव-वाणी' या ध्वनी वाहिनीचे लोकार्पण स्वातंत्र्यदिनानिमित्त कुलगुरु डॉ. शिर्के व प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते.

कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांच्या कार्यावर आधारित ध्वनीमालिका निर्माण करण्याची कल्पना सुचली. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी 'शिव-वाणी' या युट्यूब ध्वनी-वाहिनीच्या रुपाने ही संकल्पना प्रत्यक्षात आणली. विद्यापीठाचे इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील, सहकारी तसेच सुस्मिता खुटाळे यांनीही 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना' ही ध्वनी-मालिका प्रत्यक्षात येण्यासाठी घेतलेले परिश्रम वाखाणण्याजोगे आहे. या सर्व घटकांच्या प्रयत्नातून ही मालिका प्रसारित होत आहे. डॉ. जत्राटकर यांनी 'शिव-वाणी' युट्यूब ध्वनी-वाहिनी आणि 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना' या उपक्रमाविषयी सविस्तर माहिती दिली. शिरोळचे स्वातंत्र्यसैनिक दत्ताजीराव जाधव यांच्या कार्याची माहिती दिली. दररोज सकाळी ९ वाजता या मालिकेचे प्रसारण होणार आहे. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. एस. एच. ठकार, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. डी. बी. सुतार, डॉ. अवनीश पाटील, डॉ. नीलांबरी जगताप, उपकुलसचिव संजय कुबल, माणिक कदम, डॉ. पी. एस. पांडव, रणजीत यादव आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील 'शिव-वाणी' या ध्वनी वाहिनीचे उद्घाटन करताना कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा संचालक डॉ. अजितसिंह चव्हाण, डॉ. अवनिश पाटील, डॉ. अलोक जत्राटकर आदी.**

17 AUG 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मारुलकर कुटुंबीयांकडून ३५ लाख सुपूर्द

## मुलीच्या स्मृती जपल्या; शिवाजी विद्यापीठात उभारणार संशोधक विद्यार्थिनींसाठी वसतिगृह

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १६ : सुदृढावस्थेत जन्मलेली अस्मिता मारुलकर हिला वयाच्या तिसऱ्या-चौथ्या वर्षी ताप आला आणि ती विकलांग झाली. तिला पूर्ववत करण्यासाठी आई रजनी व वडील पंडित मारुलकर यांचा संघर्ष सुरू झाला. तिच्या भविष्यासाठी त्यांनी पै न पै जोडण्यास सुरुवात केली. ती उर्वरित आयुष्य विकलांग म्हणून जगेल, ही वस्तुस्थिती समोर आल्यानंतरही त्यांनी तिच्यावर जीवापाड प्रेम केले. अखेर तिने वयाच्या ४५व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. मारुलकर दांपत्याने तिच्या स्मृतिप्रीत्यर्थ ३५ लाख रुपये स्वातंत्र्यदिनी शिवाजी विद्यापीठाकडे सुपूर्द करत दातृत्व कसे असावे, याचे दर्शन घडविले. निधीतून विद्यापीठाच्या संशोधक विद्यार्थिनींसाठीचे वसतिगृह साकारले जाणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी निधीचा धनादेश स्वीकारला.

श्री. मारूलकर १९६८ ते १९९९ कालावधीत विद्यापीठाच्या सेवेत होते. सहायक कुलसचिव पदावरून ते निवृत्त झाले. त्यांची कन्या अस्मिता तीन वर्षांची असताना तापाचेनिमित्त होऊन अंथरूणाला खिळली. आपल्या माघारी तिची हेळसांड होऊ नये, यासाठी दांपत्याने ३५ लाख रुपयांची बचत केली. मात्र, आता मुलगीच न राहिल्याने तिचाच अधिकार असलेल्या रकमेचा विनियोग स्वतःसाठी न करता समाजासाठी करण्याचा निर्णय घेतला. दांपत्याने अस्मिताच्या स्मृती विद्यापीठात कायमस्वरुपी जतन केल्या जाव्यात, यासाठी तिच्या स्मरणार्थ विद्यापीठास ३५ लाख रुपये रक्कम विनाअट देणगीरूपाने आज प्रदान केली. डॉ. शिर्के यांनी मारुलकर कुटुंबियांनी ज्या भावनेतून निधी विद्यापीठास प्रदान केला, त्याचा आदर राखून संशोधक विद्यार्थिनींसाठी प्रस्तावित असलेल्या वसतिगृहाच्या बांधकामासाठी निधीचा विनियोग करण्यात येईल, अशी ग्वाही दिली. वसतिगृहाच्या प्रथम मजल्यावर 'रजनी पंडित मारूलकर आणि पंडीत मारूलकर यांनी कन्या अस्मिता हिच्या स्मृतीप्रित्यर्थ दिलेल्या देणगीतून या मजल्याचे बांधकाम झाले' अशी कोनशिला बसविण्यात येईल, असेही सांगितले.



**कोल्हापूर : अस्मिता मारुलकर यांच्या स्मरणार्थ ३५ लाख रुपयांच्या देणगीचा धनादेश कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना माजी सहायक कुलसचिव पंडित मारुलकर, रजनी मारुलकर. शेजारी डॉ. एस. एच. ठकार, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. धनंजय सुतार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. विलास शिंदे, डॉ. आण्णासाहेब गुरव, डॉ. केदार मारुलकर, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. अजितसिंह जाधव, अभय जायभाये.**

दांपत्यास विद्यापीठाच्या वतीने प्रकाशित द्विखंडीय 'तुकारामबोवांची गाथा' प्रदान करून कृतज्ञता व्यक्त केली. प्र-कुलगुरू डॉ. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी या प्रसंगी मारुलकर यांची चोख कामगिरी आणि विद्यार्थ्यांना सहकार्य करण्यास सदैव तत्पर वृत्तीचा गौरव केला. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव उपस्थित होते.

17 AUG 2022

लोकमत

ग्रंथालय कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

कन्येच्या स्मरणार्थ शिवाजी विद्यापीठाला ३५ लाखांची देणगी : संशोधक विद्यार्थिनींचे वसतिगृह साकारणार

# टाकळकर कॉलनीतील मारूलकर दाम्पत्याने जपली 'अस्मिता'

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : सुदृढावस्थेत जन्मलेली अस्मिता मारूलकर हिला अचानक ताप येण्याचे निमित्त होऊन वयाच्या तिसऱ्या वर्षी ती विकलांग बनली. आई रजनी आणि वडील पंडित यांचा तिला पूर्ववत करण्याचा संघर्ष सुरू झाला. ती बरे होऊ शकणार नाही, ही वस्तुस्थिती एक दिवस सामोरी आली. आपल्या माघारी तिच्या आयुष्याची तरतूद म्हणून पै न् पै जमवून ३५ लाख रुपयांची बचत त्यांनी केली. वयाच्या ४५ व्या वर्षी अस्मिताने दि. १९ डिसेंबर २०२० रोजी अखेरचा श्वास घेतला.



अस्मिता मारूलकर

तिच्यासाठी असणारे ३५ लाख रुपये तिच्याच स्मरणार्थ कोल्हापुरातील मारूलकर दाम्पत्याने शिवाजी विद्यापीठाला सोमवारी प्रदान केले. या देणगीतून विद्यापीठात संशोधक विद्यार्थिनींचे वसतिगृह साकारले जाणार आहे.

येथील टाकळकर कॉलनीमध्ये (क्रशर चौक परिसर) राहणारे विद्यापीठाचे माजी सहायक कुलसचिव पंडित मारूलकर आणि रजनी यांनी अस्मिता हिच्या स्मृती विद्यापीठामध्ये कायमस्वरूपी जतन केल्या जाव्यात, यासाठी तिच्या स्मरणार्थ विद्यापीठास देणगीचा धनादेश कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. संशोधक विद्यार्थिनींसाठी प्रस्तावित असलेल्या वसतिगृहाच्या बांधकामासाठी या निधीचा विनियोग करण्यात येईल, असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. वसतिगृहाच्या प्रथम मजल्यावर 'सौ. रजनी पंडित मारूलकर आणि पंडित मारूलकर यांनी कन्या अस्मिता हिच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिलेल्या देणगीतून या मजल्याचे बांधकाम झाले' अशी कोनशिला दर्शनी भागात बसविण्यात येईल, मारूलकर दाम्पत्याने या देणगीद्वारे दातृत्वाचे एक महान उदाहरण जगासमोर ठेवले आहे, असे त्यांनी सांगितले. मारूलकर दाम्पत्यास विद्यापीठातर्फे 'तुकारामबोवांची गाथा' प्रदान करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, मारूलकर यांच्या बहीण मंजिरी पलूसकर, पुतणे गिरीश, अभिजित आणि केदार मारूलकर, आदी उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात सोमवारी अस्मिता मारूलकर यांच्या स्मरणार्थ ३५ लाख रुपयांच्या देणगीचा धनादेश माजी सहायक कुलसचिव पंडित मारूलकर, रजनी मारूलकर आणि त्यांच्या कुटुंबीयांनी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी डावीकडून डॉ. पी. एस. पाटील, विलास शिंदे, आण्णासाहेब गुरव, केदार मारूलकर, आदी उपस्थित होते.

## 'अस्मिता'च्या स्मृती कायम राहतील

तापाचे निमित्त होऊन अस्मिता अंथरुणाला खिळली. तिच्या शरीराचे नियंत्रण करणारे मेंदूतील केंद्र निकामी झाले. केवळ दृष्टी, श्रवण, बुद्धिमत्ता एवढेच कायम राहिले. तिला जीवापाड सांभाळले. आपल्या माघारी तिची हेळसांड होऊ नये, यासाठी आम्ही पै न् पै साठवून ३५ लाख रुपयांची बचत केली. मात्र, आता मुलगीच न राहिल्याने तिचाच अधिकार असलेल्या रकमेचा विनियोग स्वतःसाठी न करता समाजासाठी करण्याचा निर्णय आम्ही घेतला. हा निधी अस्मिताचा आहे. तो केवळ तिच्यातर्फे आम्ही विद्यापीठास सुपूर्द केला. या देणगीतून साकारणाऱ्या वसतिगृहाच्या माध्यमातून अस्मिता हिच्या स्मृती कायम राहतील, असे सांगताना पंडित मारूलकर यांना गहिवरून आले.

17 AUG 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मारुलकर दाम्पत्याकडून विद्यापीठास ३५ लाख

## कन्येच्या स्मरणार्थ देणगी; संशोधक विद्यार्थिनींचे वसतिगृह साकारणार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अत्यंत सुदृढावस्थेत जन्मलेल्या आणि वयाच्या तिसऱ्या वर्षी अचानक तापाने विकलांग बनलेली मुलगी बरी होणार नसल्याची वस्तुस्थिती समोर आल्याने, आपल्या माघारी तिच्या आयुष्याची तरतूद म्हणून पै न् पै जोडून ३५ लाख रुपये जमविले. मात्र, वयाच्या ४५ व्या वर्षीच त्या मुलीचे निधन झाले. अशा परिस्थितीतही आई-वडिलांनी त्या मुलीसाठी जमवलेले ३५ लाख रुपये तिच्या स्मरणार्थ शिवाजी विद्यापीठाला देण्याचा निर्णय घेतला. कोल्हापूर येथील पंडित सदाशिव मारुलकर आणि सौ. रजनी पंडित मारुलकर हे या ज्येष्ठ दांपत्याचे नाव आणि अस्मिता पंडित मारुलकर ही त्यांची दिवंगत कन्या.

स्वातंत्र्यदिनाच्या अमृतमहोत्सवी सोहळ्यादिवशी मारुलकर दाम्पत्यांनी ही रक्कम विद्यापीठ प्रशासनाकडे सुपूर्द केली. यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि सर्वच अधिकारी उपस्थिती होते. या निधीमधून विद्यापीठाच्या संशोधक विद्यार्थिनींसाठीचे वसतिगृह साकारले जाणार असल्याची घोषणा कुलगुरू यांनी केली. मारुलकर दाम्पत्यास विद्यापीठाच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेली द्विखंडीय 'तुकारामबोवांची गाथा' प्रदान करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांच्यासह अधिकारी व मारुलकर कुटुंबीयांचे स्नेही व नातेवाईक उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचेण सदस्य मारुलकर हे १९६८ ते १९९९ या कालावधीमध्ये विद्यापीठाच्या सेवेत होते. सहायक कुलसचिव पदावरून ते निवृत्त झाले.



**कोल्हापूर : अस्मिता मारुलकर यांच्या स्मरणार्थ ३५ लाख देणगीचा धनादेश कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना माजी सहायक कुलसचिव पंडित मारुलकर व रजनी मारुलकर. यावेळी उपस्थित डॉ. एस. एच. ठकार, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. धनंजय सुतार, डॉ. श्रीकृष्ण महाजन आदी.**

जनसंपर्क कक्ष
१७ AUG 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मारुलकर दाम्पत्याकडून विद्यापीठास ३५ लाख

## दिवंगत कन्येच्या स्मरणार्थ देणगी, साकारणार संशोधक विद्यार्थिनींचे वसतिगृह

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अत्यंत सुदृढावस्थेत जन्मलेली एक बालिका अचानक ताप येण्याचे निमित्त होऊन वयाच्या तिसऱ्या-चौथ्या वर्षीच विकलांग, इंद्रियशिथिल बनते... आणि आई-बापाचा तिला पूर्ववत करण्याचा संघर्ष सुरू होतो... हे मूल आता बरे होऊ शकणार नाही, ही वस्तुस्थिती एक दिवस सामोरी येते... त्या वस्तुस्थितीसह ते तिला जिवापाड सांभाळतात... आपल्या माघारी तिच्या आयुष्याची तरतूद म्हणून पै न पै जोडून ३५ लाख रुपयांची बचत करतात; मात्र वयाच्या ४५ व्या वर्षी ती मुलगी अखेरचा श्वास घेते... तिच्या जाण्याने कोलमडून पडलेले हे दाम्पत्य तिच्यासाठी जमा केलेले ३५ लाख रुपये तिच्याच स्मरणार्थ शिवाजी विद्यापीठाला प्रदान करते... स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने हा हृद्य सोहळा विद्यापीठामध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि अधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये घडून आला. पंडित सदाशिव मारुलकर आणि रजनी पंडित मारुलकर असे या ज्येष्ठ दाम्पत्याचे नाव आणि अस्मिता ही त्यांची दिवंगत कन्या!

मारुलकर हे १९६८ ते १९९९ या कालावधीमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या सेवेत होते. सहायक कुलसचिवपदावरून ते निवृत्त झाले. त्यांची कन्या अस्मिता तीन वर्षांची असताना तापाचे निमित्त होऊन अंथरुणाला खिळली. तिच्या शरीराचे नियंत्रण करणारे मेंदूतील केंद्र निकामी झाले. केवळ दृष्टी, श्रवण आणि बुद्धिमत्ता एवढेच कायम राहिले. दि. १९ डिसेंबर, २०२० रोजी वयाच्या ४५ व्या वर्षी तिने या जगाचा निरोप घेतला.

अस्मिता हिच्या स्मरणार्थ शिवाजी विद्यापीठास ३५ लाख रुपये प्रदान केले. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांनी वसतिगृहाच्या प्रथम मजल्यावर 'सौ. रजनी पंडित मारुलकर आणि पंडित मारुलकर यांनी कन्या अस्मिता हिच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिलेल्या देणगीतून या मजल्याचे बांधकाम झाले' अशी कोनशिला दर्शनी भागात बसवण्यात येईल, असे सांगितले.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी याप्रसंगी मारुलकर यांची विद्यापीठीय सेवेमधील चोख कामगिरी आणि विद्यार्थ्यांना सहकार्य करण्यास सदैव तत्पर असलेल्या वृत्तीचा गौरव केला.

यावेळी मारुलकर यांनी, हा निधी अस्मिताचा आहे. तो केवळ तिच्या वतीने आम्ही विद्यापीठास सुपूर्द करत आहोत, असे सांगितले.

17 AUG 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पाऊस पकडण्यात १६२ महाविद्यालये पास

## शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील चित्र : नवीन इमारत बांधताना रेन वॉटर हार्वेस्टिंगचा आवर्जून विचार

संतोष मिठारी
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पावसाचे पाणी भूगर्भात जावे अथवा त्याचा पुनर्वापर व्हावा यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) सर्व महाविद्यालयांना त्यांच्या इमारतींवर वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प उभारण्याचे निर्देश दिले. त्यानुसार शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील २७७ पैकी १६२ महाविद्यालयांनी या प्रकल्पाची उभारणी करून पाऊस पकडण्यात यश मिळविले आहे.

सध्या पावसाचे वातावरण असून या प्रकल्पात कितीजण पास होतात याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते.

### कॅच दी रेन

मार्च ते मे मध्ये देशाच्या विविध भागांमध्ये निर्माण होणाऱ्या दुष्काळी परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी यूजीसीने देशातील सर्व विद्यापीठे, त्यांच्याशी संलग्न कॉलेजं, शैक्षणिक संस्था यांना 'कॅच दी रेन' उपक्रम राबवण्याच्या सूचना जुलै २०२० मध्ये दिल्या. या उपक्रमांतर्गत जमिनीतील पाण्याची पातळी वाढवण्यासाठी सर्व विद्यापीठे, कॉलेज प्रशासनांनी विद्यार्थ्यांच्या मदतीने आपल्या परिसरात रेन वॉटर हार्वेस्टिंग स्ट्रक्चर उभारून पाणी पावसाचे झिरपवण्यासाठी प्रयत्न करायचे आहेत.



### का नाही पकडला पाऊस?

जुन्या इमारती आणि काही तांत्रिक कारणांमुळे विद्यापीठ परिक्षेत्रातील ११५ महाविद्यालयांना पाऊस पकडता आलेला नाही. वर्ग, ग्रंथालय, वसतिगृह, आदींची नवीन इमारत बांधताना सौरऊर्जा, रेन वॉटर हार्वेस्टिंगचा आवर्जून विचार आणि त्याअनुषंगाने कार्यवाही महाविद्यालयांकडून केली जात असल्याचे विद्यापीठाच्या संलग्नता विभागाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एस. सोयम यांनी शुक्रवारी सांगितले.

### जलपुनर्भरण, पुनर्वापर



कोल्हापूर जिल्ह्यातील ९२, सांगलीतील ३०, सातारामधील ४० महाविद्यालयांनी रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्पाची उभारणी केली. याद्वारे जलपुनर्भरणासह कॅम्पसमधील बगीचा, प्रयोगशाळेत डिस्टिल्ड वॉटर म्हणून पावसाच्या पाण्याचा वापर महाविद्यालये करीत आहेत.

### विद्यापीठात ३० कोटी लिटर पाण्याची साठवण

शिवाजी विद्यापीठाने कॅम्पसमध्ये जलसंधारणाची अनेक कामे केली. यामध्ये दोन विहिरींच्या पुनरुज्जीवनासह तीन शेततळ्यांचा समावेश होता. याकामी विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी, महाविद्यालयांचे शारीरिक शिक्षण संचालक, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी यांनी योगदान दिले. त्यामुळे पावसात विद्यापीठ कॅम्पसवर ३० कोटी लिटर पाणी साठविले जाते. 'जलयुक्त विद्यापीठ' मोहिमेची 'असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज'ने दखल घेतली.

महाविद्यालयाच्या मुख्य इमारतीवर रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प राबविला आहे. त्यातून संकलित होणारे पाणी प्रयोगशाळेत डिस्टिल्ड वॉटर म्हणून वापरले जाते.

\- डॉ. आर. आर. कुंभार, प्राचार्य, विवेकानंद कॉलेज

कॉलेज कॅम्पसवरील वसतिगृहाच्या इमारतीवर वॉटर हार्वेस्टिंग केले जात आहे. त्यातील पाणी परिसरातील बगिचासाठी वापरण्यात येते.

\- डॉ. तेजस्विनी मुडेकर, प्राचार्य, कमला कॉलेज

पुण्यनगरी

# स्वातंत्र्यसैनिकांच्या योगदानाला 'शिव-वाणी'च्या माध्यमातून उजाळा : कुलगुरू डॉ. शिर्के



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या 'शिव-वाणी' या यूट्यूब ध्वनी वाहिनीचे कळ दाबून लोकार्पण करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आदी.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त शिवाजी विद्यापीठ 'शिव-वाणी' या वाहिनीचे लोकार्पण करत आहे. या माध्यमातून 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना!' या ध्वनी-मालिकेस प्रारंभ करण्यात येतो आहे. स्वातंत्र्यसैनिकांच्या योगदानाला उजाळा देण्याच्या विद्यापीठाच्या या प्रयत्नाचे निश्चितपणे स्वागत होईल, असा विश्वास कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी सोमवारी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाच्या जनसंपर्क कक्षाच्या 'शिव-वाणी' या यूट्यूबवरील ध्वनी वाहिनीचे लोकार्पण स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, अवघ्या आठवडाभरात जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी 'शिव-वाणी' या यूट्यूब ध्वनी-वाहिनीच्या रूपाने तिला प्रत्यक्षात आणले, ही अभिनंदनीय बाब आहे. विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनिश पाटील आणि त्यांचे सहकारी, तसेच सुस्मिता खुटाळे यांनीही 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना!' ही ध्वनी-मालिका प्रत्यक्षात येण्यासाठी घेतलेले परिश्रम वाखाणण्याजोगे आहेत.

यावेळी डॉ. आलोक जत्राटकर यांनी 'शिव-वाणी' यूट्यूब ध्वनी-वाहिनी आणि 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना' या उपक्रमांविषयी माहिती दिली. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी संगणकाची कळ दाबून 'शिव-वाणी'चे लोकार्पण केले.

या लोकार्पणप्रसंगी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. एस. एच. ठकार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. डी. बी. सुतार, डॉ. अवनिश पाटील, डॉ. नीलांबरी जगताप, संजय कुबल, माणिक कदम, डॉ. पी. एस. पांडव, रणजित यादव आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात विभाजन विभिषिका स्मृती प्रदर्शन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात दि. १४ ऑगस्ट हा दिवस विभाजन विभिषिका स्मृती दिन म्हणून पाळण्यात आला. यानिमित्ताने शिवाजी विद्यापीठात डिजिटल 'विभाजन विभिषिका स्मृती प्रदर्शन' आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनाची कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह सर्वच अधिकाऱ्यांनी पाहणी केली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीत १४ ऑगस्ट या विभाजन विभिषिका स्मृती दिनानिमित्त विद्यार्थी विकास विभाग व जनसंपर्क कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'विभाजन विभिषिका स्मृती प्रदर्शन' डिजिटल स्वरूपात आयोजित करण्यात आले. प्रदर्शनाची पाहणी कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केली. ते म्हणाले, 'फाळणीचे दुःख मोठे आहे. भारतीय स्वातंत्र्याला या दुःखाची काळी किनार आहे. स्वातंत्र्य साजरे करीत असताना आपण स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांबरोबरच या विभाजनावेळी प्राण गमवावे लागणाऱ्या व्यक्तींचेही स्मरण करणे आवश्यक आहे.

याप्रसंगी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक अजितसिंह जाधव, एस. एच. ठकार, श्रीकृष्ण महाजन, एम. एस. देशमुख, आर. व्ही. गुरव, ए. एम. गुरव, डी. बी. सुतार, पी. टी. गायकवाड, अभय जायभाये उपस्थित होते.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठात विभीषिका स्मृतिदिन

**कोल्हापूर, ता. १६ :** शिवाजी विद्यापीठात १४ ऑगस्ट दिवस विभाजन विभीषिका स्मृतिदिन म्हणून पाळला. या निमित्ताने शिवाजी विद्यापीठात डिजिटल 'विभाजन विभीषिका स्मृती प्रदर्शन' झाले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रदर्शनाची आज पाहणी केली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीत १४ ऑगस्ट या विभाजन विभीषिका स्मृती दिनानिमित्त विद्यार्थी विकास विभाग व जनसंपर्क कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने प्रदर्शन आले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठाता डॉ. एस. एच. ठकार, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. ए. एम. गुरव, ज्ञानस्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. डी. बी. सुतार, क्रीडा संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, अभय जायभाये यांनी प्रदर्शनाची पाहणी केली.